**Fortis**

Monthly Dossier –June2017

| Publication | Headline | Date | Pg. No |
|---|---|---|---|
| Tarun Bharat | Woman’s organ donation gave life to 4 patients | 03.06.2017 | 02 |



# महिलेच्या अवयवदानाने चौघांना जीवनदान

## मुंबईत ५० वे हृदयप्रत्यारोपण ; हृदय, यकृताचे दान, डोळे नेत्रपेढीकडे

प्रतिनिधी
मुंबई

एका ५५ वर्षीय महिलेच्या मेंदूत तीव्र रक्तस्त्राव झाला आणि त्या कामाच्या ठिकाणी कोसळल्या. बुधवारी रात्री मुलुंड येथील फोर्टिस रुग्णालयात त्यांना ब्रेनडेड घोषित केले. यावेळी तिच्या जागरुक नातेवाईकांनी त्यांचे अवयवदान केले. आणि चौघांच्या जीवनात नवी आशा फुलवली. एक पुरुष आणि दोन महिलांना अनुक्रमे हृदय, यकृत आणि मूत्रपिंड मिळाल्याने त्यांना जीवनदान मिळाले. तसेच दान केलेले डोळे नेत्रपेढीत पाठविण्यात आल्याने लवकरच आणखी एकाला दृष्टी मिळेल. अवयवदान करणाऱ्या कुटुंबियांना डॉ. संजय ओक यांनी मार्गदर्शन केले होते.

> ‘अवयदात्याच्या रूपात जणू आम्हाला देवच भेटला. त्यांनी आपल्या मृत्यूनंतर केवळ माझ्या भावाचेच नव्हे तर आणखी तिघांचे प्राण वाचवले. आमच्या हृदयावर त्यांची प्रतिमा कायमची कोरली गेली आहे.’
> **विशाल, हृदय मिळालेल्या रुग्णाचा भाऊ**

**मुंबईतील ५० वे हृदयप्रत्यारोपण**

मुंबईतील ५० वे हृदय प्रत्यारोपण फोर्टिस रुग्णालयात यशस्वीरित्या करण्यात आले. एक वर्ष नऊ महिने या काळात मुंबईतील हे ५०वे हृदयप्रत्यारोपण ठरले. मुंबईतील पहिले प्रत्यारोपण ऑगस्ट २०१५मध्ये फोर्टिस रुग्णालयात पार पडले होते.

ब्रेनडेड महिलेचे हृदय साताऱ्याच्या ३७ वर्षीय पुरुषाच्या शरीरात प्रत्यारोपित करण्यात आले. ही शस्त्रक्रिया डॉ. अन्वय मुळे यांनी केली. हा रुग्ण डायलेटेड कार्डिओमायोपथीने ग्रस्त असल्याचे निदान केले होते.

यकृतप्रत्यारोपण हे कोलकाता येथील एका ६० वर्षीय महिलेच्या शरीरात केले. ही शस्त्रक्रियासुद्धा फोर्टिसमध्येच करण्यात आली. हिपॅटो-पॅंक्रियाटिव-बिलरी व प्रत्यारोपण शस्त्रक्रिया विभागाचे वरिष्ठ सल्लागार डॉ. राकेश राय यांनी केली. या वर्षीच्या फेब्रुवारीपासून त्यांचे नाव प्रतीक्षायादीमध्ये होते. तसेच मूत्रपिंड हे ठाणे येथील २७ वर्षीय महिलेच्या शरीरात प्रत्यारोपित केले. ही शस्त्रक्रिया युरोलॉजिस्ट व ट्रान्सप्लान्ट सर्जन डॉ. रमेश महाजन व नेफ्रोलॉजिस्ट डॉ. हरेश दोडेजा यांनी केली. ही महिला गेली चार वर्षे मूत्रपिंड आजाराने पीडित होती. दुसरे मूत्रपिंड शहरातील दुसऱ्या एका हॉस्पिटलमध्ये पाठविण्यात आले असून डोळे नेत्रपेढीकडे सुपूर्द केले आहेत.

| Publication | Headline | Date | Pg. No |
|---|---|---|---|
| Shivner | 50th Heart transplant at Fortis Hospital Mulund | 02.06.2017 | 03 |

# मुंबईतील ५०वे हृदय प्रत्यारोपण मुलुंड येथील फोर्टिस हॉस्पिटलमध्ये यशस्वीरीत्या पार पडले

## शहरातील २१व्या मरणोत्तर अवयवदानामुळे हृदय, यकृत व मूत्रपिंड प्रत्यारोपणातून चौघांना जीवदान. दान केलेली नेत्रपिंडे नेत्रपेढीकडे पाठवली

मुंबई, गुरुवार : मुंबईतील पन्नासावे हृदय प्रत्यारोपण आज मुलुंड येथील फोर्टिस हॉस्पिटलमध्ये यशस्वीरीत्या पार पडले. अवयवदात्याच्या कुटुंबियांनी हृदय, यकृत, मूत्रपिंड व नेत्रपिंडांचे दान करून अवयवदानाच्या मोहिमेला बळ दिले आहे. शहरातील वर्षभरातील ह्या २१व्या अवयवदानामुळे आज सकाळी फोर्टिस हॉस्पिटल येथे तीन रुग्णांना जीवदान मिळाले. या अवयवदानातून मिळालेले आणखी एक मूत्रपिंड शहरातील दुसऱ्या एका हॉस्पिटलमध्ये पाठविण्यात आले तर नेत्रपिंड नेत्रपेढीकडे सुपूर्द करण्यात आली. अवयवदानाच्या मोहिमेला मिळणाऱ्या मोठ्या प्रतिसादामुळे शहरातील एकूण हृदय प्रत्यारोपणांची संख्या १ वर्ष आणि ९ महीने इतक्या विक्रमी काळात ५० वर पोहोचली आहे. मुंबईतील पहिले प्रत्यारोपण ऑगस्ट २०१५मध्ये मुलुंड येथील फोर्टिस हॉस्पिटलमध्ये पार पडले होते.

या घटनेतील अवयवदाता एक ५५ वर्षीय महिला आहेत. मध्यम तीव्रतेचा अंतर्गत रक्तस्राव (Sub-acute Hemorrhage) झाल्याने त्या आपल्या कामाच्या ठिकाणी कोसळल्या. काल रात्री मुलुंड येथील फोर्टिस हॉस्पिटलमध्ये त्यांना ब्रेन डेड घोषित करण्यात आले. अवयवदानाविषयी जाण असलेल्या कुटुंबियांनी दात्याच्या अवयवदानाच्या इच्छेला होकार दिला. या सर्व काळात या कुटुंबियांचे शेजारी व वैद्यकीय क्षेत्रातील एक नामांकित व्यक्तिमत्व, डॉ. संजय ओक यांनी मार्गदर्शन केले.

दात्याचे हृदय सातार्‍याच्या ३७ वर्षीय पुरुषाच्या शरीरात प्रत्यारोपित करण्यात आले. ही शस्त्रक्रिया मुलुंड येथील फोर्टिस हॉस्पिटलच्या हृदय प्रत्यारोपण पथकाचे प्रमुख डॉ. अन्वय मुळे यांनी केली. हा रुग्ण डायलेटेड कार्डिओमायोपथीने ग्रस्त असल्याचे निदान करण्यात आले होते व यावर्षीच्या एप्रिल महिन्यापासून प्रत्यारोपणयोग्य हृदयाच्या प्रतिक्षेत होता. यकृताचे प्रत्यारोपण कोलकाता येथील एका साठ वर्षीय महिलेच्या शरीरात बसविण्यात आले व ही शस्त्रक्रिया मुलुंड येथील फोर्टिस हॉस्पिटलच्या हिपॅटो-पॅनक्रियाटिक-बिलरी व प्रत्यारोपण शस्त्रक्रिया विभागाचे वरीष्ठ सल्लागार डॉ. राकेश राय यांनी केली. या महिलेचे यकृत निकामी झाले होते व यावर्षीच्या फेब्रुवारी महिन्यापासून त्यांचे नाव प्रतिक्षा यादीमध्ये होते. दात्याचे मूत्रपिंड ठाणे येथील २७ वर्षीय महिलेच्या शरीरात प्रत्यारोपित करण्यात आले. ही शस्त्रक्रिया मुलुंड येथील फोर्टिस हॉस्पिटलचे युरोलॉजिस्ट व ट्रान्सप्लान्ट सर्जन डॉ. रमेश महाजन व नेफ्रोलॉजिस्ट डॉ. हरेश दोडेजा यांनी केली. ही महिला गेली चार वर्षे दुर्धर मूत्रपिंड विकाराने (Chronic Kidney Disease)ने पीडित होती. नवे अवयव प्राप्त झालेल्या रुग्णांना मुलुंड येथील फोर्टिस हॉस्पिटलच्या अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले असून हॉस्पिटलच्या अतिदक्षता विभागाचे संचालक डॉ. राहुल पंडित यांच्या नेतृत्वाखालील विशेषज्ञांच्या पथकाकडून त्यांच्या प्रकृतीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.

अवयवदाता महिला व त्यांच्या कुटुंबियांचे मनापासून आभार मानताना नवे हृदय प्राप्त करणाऱ्या रुग्णाचे बंधू विशाल म्हणाले, "या अवयवदात्याच्या रुपात जणू आम्हाला देवच भेटला. त्यांनी आपल्या मृत्यूनंतर केवळ माझ्या भावाचेच नव्हे तर आणखी तिघांचे प्राण वाचवले. आमच्या हृदयावर त्यांची प्रतिमा कायमची कोरली गेली आहे."

मुंबईतील पन्नासाव्या हृदयप्रत्यारोपणानिमित्त तसेच २१व्या मरणोत्तर देहदानानिमित्त मुलुंड येथील फोर्टिस हॉस्पिटलचे विभागीय संचालक डॉ. एस नारायणी म्हणाले, "मुंबई शहर आपल्या दिलदार स्वभावाशी नेहमीच इमान राखत आले आहे, खरेतर येथे हृदय प्रत्यारोपण कार्यक्रम जागतिक स्तरावर सगळ्यात वेगवान पद्धतीने राबविला जात आहे. एक उदाहरण म्हणून नोंदवण्यासारखे हे यश दात्याबरोबर काम करणारे पथक तसेच प्राप्तकर्त्यांसोबत काम करणारे पथक यांच्या अतुलनीय पाठबळाशिवाय शक्यच झाले नसते. अवयवांच्या सुलभ हस्तांतरणाच्या कामामध्ये प्रशासकीय अधिकारी आमचे आधारस्तंभ राहिले आहेत. हा लक्षणीय प्रसंग म्हणजे हृदय प्रत्यारोपण कार्यक्रमाचा खराखुरा सुवर्णमहोत्सव आहे."

फोर्टिस हेल्थकेअर लिमिटेड विषयी:

फोर्टिस हेल्थकेअर लिमिटेड ही भारतातील आघाडीची एकात्मिक आरोग्य सेवा विषयक सुविधांची पुरवठादार कंपनी आहे. कंपनीच्या हेल्थकेअर सेवांमध्ये हॉस्पिटल्स, निदान व डे केअर स्पेशालिटी सुविधांचा समावेश आहे. सध्या, या कंपनीचे हेल्थकेअरविषयक जाळे भारत, दुबई, मॉरिशस व श्रीलंका या देशांत पसरले आहे, ज्यामध्ये ४५ हेल्थकेअर सुविधा (विकसित होत असलेल्या प्रकल्पांसह), अंदाजे १०,००० संभाव्य बेड्स व ३४६ निदान केंद्रे समाविष्ट आहेत.

| Publication | Headline | Date | Pg. No |
|---|---|---|---|
| Lokmat | Organ donation gave life to 4 patients | 03.06.2017 | |



हृदयप्रत्यारोपणाचे अर्धशतक : वर्षभरातील २१वे मरणोत्तर अवयवदान

# अवयवदानामुळे चौघांना जीवनदान

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : मुंबईतील पन्नासावी हृदयप्रत्यारोपण शस्त्रक्रिया मुलुंड येथील खासगी रुग्णालयात यशस्वीरीत्या पार पडली. शहरातील वर्षभरातील हे २१ वे अवयवदान होते. यामुळे तीन रुग्णांना जीवनदान मिळाले. या अवयवदानातून मिळालेले आणखी एक मूत्रपिंड शहरातील दुसऱ्या एका रुग्णालयात पाठविण्यात आले तर नेत्र नेत्रपेढीकडे सुपुर्द करण्यात आले. गुरुवारी झालेल्या या अवयवदानामुळे मुंबईत २०१५-२०१७ या काळात ५० हृदयप्रत्यारोपण शस्त्रक्रिया झाल्या आहेत.

या घटनेतील अवयवदाता एक ५५ वर्षीय महिला आहे. मध्यम तीव्रतेचा अंतर्गत रक्तस्राव झाल्याने त्यांना मुलुंड येथील फोर्टिस हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. तेथे त्यांना ब्रेन डेड घोषित करण्यात आले. कुटुंबीयांनी दात्याच्या इच्छेनुसार अवयवदान करण्याचे ठरवले. त्यासाठी डॉ. संजय ओक यांनी मार्गदर्शन केले. दात्याचे हृदय साताऱ्याच्या ३७ वर्षीय पुरुषाच्या शरीरात प्रत्यारोपित करण्यात आले. ही शस्त्रक्रिया डॉ. अन्वय मुळे यांनी केली. तर यकृताचे प्रत्यारोपण कोलकाता येथील एका ६० वर्षीय महिलेच्या शरीरात करण्यात आले. ही शस्त्रक्रिया हिपॅटो-पॅंक्रियाटिक-बिलरी व प्रत्यारोपण शस्त्रक्रिया विभागाचे वरिष्ठ सल्लागार डॉ. राकेश राय यांनी केली. दात्याचे मूत्रपिंड ठाणे येथील २७ वर्षीय महिलेच्या शरीरात प्रत्यारोपित करण्यात आले. ही शस्त्रक्रिया युरोलॉजिस्ट व ट्रान्सप्लान्ट सर्जन डॉ. रमेश महाजन व नेफ्रोलॉजिस्ट डॉ. हरेश दोडेजा यांनी केली. नवे अवयव प्राप्त झालेल्या रुग्णांना मुलुंड येथील रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले असून, डॉ. राहुल पंडित यांच्या नेतृत्वाखालील विशेष पथक त्यांची देखरेख करत आहेत.

> हृदय प्रत्यारोपण कार्यक्रम जागतिक स्तरावर वेगवान पद्धतीने राबविला जात आहे. अवयवांच्या सुलभ हस्तांतरणाच्या कामामध्ये प्रशासकीय अधिकारी आधारस्तंभ राहिले आहेत. करण्यात आलेल्या यशस्वी शस्त्रक्रिया म्हणजे हृदयप्रत्यारोपण कार्यक्रमाचा खराखुरा सुवर्णमहोत्सव आहे.
>
> - डॉ. एस. नारायणी, फोर्टिस रुग्णालय, विभागीय संचालक

> अवयवदात्याच्या रूपात जणू आम्हाला देवच भेटला. त्यांनी आपल्या मृत्यूनंतर केवळ माझ्या भावाचेच नव्हे, तर आणखी तिघांचे प्राण वाचवले. आमच्या हृदयावर त्यांची प्रतिमा कायमची कोरली गेली आहे.
>
> - नवे हृदय मिळालेल्या रुग्णाचा भाऊ

अवयवदानाच्या मोहिमेला मिळणाऱ्या मोठ्या प्रतिसादामुळे शहरातील एकूण हृदयप्रत्यारोपणांची संख्या १ वर्ष आणि ९ महिने इतक्या विक्रमी काळात ५०वर पोहोचली आहे. मुंबईतील पहिले प्रत्यारोपण ऑगस्ट २०१५मध्ये मुलुंड येथील खासगी रुग्णालयात पार पडले होते.

| Publication | Headline | Date | Pg. No |
|---|---|---|---|
| Sakal | Woman’s organ donation cave life to 3 patients | 0806.2017 | 02 |



# महिलेच्या अवयवदानामुळे तिघांना मिळाले जीवदान

## फोर्टीस रुग्णालयात ५० वे यशस्वी हृदय प्रत्यारोपण

मुलुंड, ता. ७ : चक्कर येऊन पडल्यावर डोक्याला मार लागल्याने ब्रेन डेड झालेल्या मुलुंडमधील ५५ वर्षीय महिलेच्या नातेवाईकांनी अवयवदानाचा निर्णय घेतल्याने तीन रुग्णांना जीवदान मिळाले आहे. या महिलेने दान केलेल्या हृदयामुळे फोर्टीस रुग्णालयाने ५० वी यशस्वी हृदय प्रत्यारोपण शस्त्रक्रिया केली.

डोक्याला मार लागल्याने बेशुद्ध होऊन पडलेल्या या महिलेला तिच्या नातेवाईकांनी तातडीने मुलुंडमधील फोर्टीस रुग्णालयात दाखल केले, पण उपचारादरम्यान तिचे ब्रेन डेड झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. महिलेच्या मृत्यूनंतर डॉ. संजय ओक यांनी महिलेच्या नातेवाईकांना अवयवदान करण्याचे सुचवले. त्यांच्या कुटुंबीयांनीही त्याला मान्यता दिली. या महिलेचे मूत्रपिंड, डोळे, यकृत, हृदय दान करण्यात आले. साताऱ्याच्या ३७ वर्षीय रुग्णावर हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अन्वय मुळे यांनी यशस्वीरीत्या शस्त्रक्रिया करून ५० वे हृदय प्रत्यारोपण पार पाडले. कोलकत्त्याहून आलेल्या ६० वर्षीय महिलेला यकृत मिळाले. तसेच ठाण्याच्या रुग्णाला मूत्रपिंड देण्यात आले.

| Publication | Headline | Date | Pg. No |
|---|---|---|---|
| Navrashtra | $50^{th}$ Heart transplant in Mumbai | 02.06.2017 | 01 |



# मुंबईतील ५० वे ह्रदय प्रत्यारोपण यशस्वी

## ब्रेन डेड महिलेचे अवयवदान

**मुंबई :** मुंबईतील ५० वे ह्रदय प्रत्यारोपण गुरुवारी मुलुंड येथील फोर्टिस रुग्णालयात यशस्वीरित्या पार पडले. अवयवदात्याच्या कुटुंबियांनी ह्रदय, यकृत, मूत्रपिंड व नेत्रपिंडांचे दान करून अवयवदानाच्या मोहिमेला बळ दिले आहे. शहरातील वर्षभरातील ह्या २१ व्या अवयवदानामुळे तीन रुग्णांना जीवदान मिळाले आहे. या अवयवदानातून मिळालेले आणखी एक मूत्रपिंड शहरातील दुसऱ्या एका हॉस्पिटलमध्ये पाठविण्यात आले तर नेत्र नेत्रपेढीकडे सुपूर्द करण्यात आली आहेत. अवयवदानाबाबात जनजागृती होत असल्याने गेल्या १ वर्ष ९ महिने इतक्या काळात ५ हृदयप्रत्यारोपण करण्यात आली. अवयवदाता या ५५ वर्षीय महिला होत्या. मध्यम तीव्रतेचा अंतर्गत रक्तस्त्राव झाल्याने त्यांच्या कामाच्या ठिकाणी त्यांची प्रकृती बिघडली. त्यांना रात्री मुलुंड येथील फोर्टिस रुग्णालय आणण्यात आले त्यावेळी त्यांना ब्रेन डेड म्हणून घोषित करण्यात आले.

■ सदर कुटुंबाला अवयवदानाबाबत कल्पना असल्याने त्यांनी रुग्णालयातील डॉक्टरांचा याबाबत सल्ला घेतला. डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी अवयवदान प्रक्रिया पूर्ण केली. अवयवदात्याचे ह्रदय सातारा येथील ३७ वर्षीय पुरुषाच्या शरीरात प्रत्यारोपित करण्यात आले. हा रुग्ण डायलेटेड कार्डिओमायोपथीने ग्रस्त असल्याचे निदान करण्यात आले होते व यावर्षीच्या एप्रिल महिन्यापासून ह्रदय प्रत्यारोपणाच्या प्रतिक्षेत होते. यकृताचे प्रत्यारोपण कलकत्ता येथील एका साठ वर्षीय महिलेच्या शरीरात बसविण्यात आले व ही शस्त्रक्रिया मुलुंड येथील फोर्टिस हॉस्पिटलच्या हिपॅटो-पँक्रियाटिक-बिलरी व प्रत्यारोपण शस्त्रक्रिया विभागाचे वरीष्ठ सल्लागार डॉ. राकेश राय यांनी केली.

## चौघांना मिळाले जीवदान

या महिलेचे यकृत निकामी झाले होते व यावर्षीच्या फेब्रुवारी महिन्यापासून त्यांचे नाव प्रतिक्षा यादीमध्ये होते. दात्याचे मूत्रपिंड ठाणे येथील २७ वर्षीय महिलेच्या शरीरात प्रत्यारोपित करण्यात आले. ही महिला गेली चार वर्षे दुर्धर मूत्रपिंड विकाराने पीडित होती. हे सर्व रुग्णांची रुग्णालयातील विशेष डॉक्टरांचे पथक देखरेख करत आहे. २१ व्या मरणोत्तर देहदानानिमित्त मुलुंड येथील फोर्टिस हॉस्पिटलचे विभागीय संचालक डॉ. एस नारायणी म्हणाले, 'मुंबई शहर आपल्या दिलदार स्वभावाशी नेहमीच इमान राखत आले आहे. खरेतर येथे ह्रदय प्रत्यारोपण कार्यक्रम जागतिक स्तरावर सगळ्यात वेगवान पद्धतीने राबविला जात आहे. मोठ्या प्रमाणात होत असलेल्या जनजागृतीमुळे नागरिक पुढे सरसावत आहेत.'

| Publication | Headline | Date | Pg. No |
|---|---|---|---|
| AaplaMahanagar | 50th Heart transplant in Mumbai | 05.06.2017 | 02 |

# मुंबईतील ५०वे हृदय प्रत्यारोपण फोर्टिस हॉस्पिटलमध्ये

● मुंबई । प्रतिनिधी

मुंबईतील पन्नासावे हृदय प्रत्यारोपण आज मुलुंड येथील फोर्टिस हॉस्पिटलमध्ये यशस्वीरीत्या पार पडले. अवयवदात्याच्या कुटुंबियांनी हृदय, यकृत, मूत्रपिंड व नेत्रपिंडांचे दान करून अवयवदानाच्या मोहिमेला बळ दिले आहे. शहरातील वर्षभरातील ह्या २१व्या अवयवदानामुळे आज सकाळी फोर्टिस हॉस्पिटल येथे तीन रुग्णांना जीवदान मिळाले. या अवयवदानातून मिळालेले आणखी एक मूत्रपिंड शहरातील दुस-या एका हॉस्पिटलमध्ये पाठविण्यात आले तर नेत्रपिंडि नेत्रपेढीकडे सुपूर्द करण्यात आली. अवयवदानाच्या मोहिमेला मिळणा-या मोठ्या प्रतिसादामुळे शहरातील एकूण हृदय प्रत्यारोपणांची संख्या १ वर्ष आणि ९ महीने इतक्या विक्रमी काळात ५० वर पोहोचली आहे. मुंबईतील पहिले प्रत्यारोपण ऑगस्ट २०१५मध्ये मुलुंड येथील फोर्टिस हॉस्पिटलमध्ये पार पडले होते.

या घटनेतील अवयवदाता एक ५५ वर्षीय महिला आहेत. मध्यम तीव्रतेचा अंतर्गत रक्तस्राव झाल्याने त्या आपल्या कामाच्या ठिकाणी कोसळल्या. काल रात्री मुलुंड येथील फोर्टिस हॉस्पिटलमध्ये त्यांनी ब्रेन डेड घोषित करण्यात आले. अवयवदानाविषयी जाण असलेल्या कुटुबियांनी दात्याच्या अवयवदानाच्या इच्छेला होकार दिला. या सर्व काळात या कुटुंबियांचे शेजारी व वैद्यकीय क्षेत्रातील एक नामांकित व्यक्तिमत्व, डॉ. संजय ओक यांनी मार्गदर्शन केले. दात्याचे हृदय सातार्याच्या ३७ वर्षीय पुरुषाच्या शरीरात प्रत्यारोपित करण्यात आले. ही शस्त्रक्रिया मुलुंड येथील फोर्टिस हॉस्पिटलच्या हृदय प्रत्यारोपण पथकाचे प्रमुख डॉ. अन्वय मुळे यांनी केली. हा रुग्ण डायलेटेड कार्डिओमायोपथीने ग्रस्त असल्याचे निदान करण्यात आले होते व यावर्षीच्या एप्रिल महिन्यापासून प्रत्यारोपणयोग्य हृदयाच्या प्रतिक्षेत होता. यकृताचे प्रत्यारोपण कोलकाता येथील एका साठ वर्षीय महिलेच्या शरीरात बसविण्यात आले व ही शस्त्रक्रिया मुलुंड येथील फोर्टिस हॉस्पिटलच्या हिपॅटो-पॅंक्रियाटिक-बिलरी व प्रत्यारोपण शस्त्रक्रिया विभागाचे वरीष्ठ सल्लागार डॉ. राकेश राय यांनी केली.

| Publication | Headline | Date | Pg. No |
|---|---|---|---|
| Mahrashtra times | 50th Heart transplant | 06.06.017 | 02 |

# ५०वे हृदय प्रत्यारोपण

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

मुलुंडच्या फोर्टिस रुग्णालयामध्ये पन्नासावी हृदयप्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली.

हृदयप्रत्यारोपण शस्त्रक्रियेसारख्या किचकट शस्त्रक्रियांचे यशस्वी होण्याचे प्रमाण फारसे नसताना डॉ. अन्वय मुळे यांनी पुढाकार घेऊन या प्रत्यारोपणप्रक्रियेची सुरुवात केली. या अवयवदानामुळे फोर्टिस रुग्णालयातील तीन रुग्णांना जीवदान मिळाले. या अवयवदानातून मिळालेले आणखी एक मूत्रपिंड शहरातील दुसऱ्या एका रुग्णालयामध्येही पाठविण्यात आले. तर, नेत्रपटल नेत्रपेढीकडे देण्यात आले. या घटनेतील अवयवदाता ५५ वर्षीय महिला आहेत. अवयवदानाविषयी संवेदनशीलता असलेल्या त्यांच्या कुटुंबीयांनी दात्याच्या अवयवदानाच्या इच्छेला होकार दिला. दात्याचे हृदय साताऱ्याच्या ३७ वर्षीय पुरुषाच्या शरीरात प्रत्यारोपित करण्यात आले.